# ऋणनिर्देश

हा प्रबंध सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. प्रबंधाचे कार्य पूर्ण करताना ज्या ज्या व्यक्ती आणि संस्था यांचे सहकार्य मला मिळाले त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो.

माझे मार्गदर्शक डॉ. सौ. वैजयंती नाईकनवरे यांनी मला आपला विद्यार्थी म्हणून स्विकारला तसेच संशोधन काळात मला त्यांचे कुशल मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले यामुळे मी हे संशोधन कार्य पुर्ण करु शकलो. त्यांचे माझ्यावर खरेच मोठे ऋण आहे त्यामुळे सर्व प्रथम मी त्यांच्या बद्दल आदर पूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो आणि त्यांचे मन:पुर्वक आभार मानतो.

सोलापूरचे आमचे गुरुवर्य कै. प्रा. जी. एल. भिडे सर आणि पंढरपूरचे आमचे स्नेही कै. डॉ. गोपाळराव बेणारे यांनी या प्रबंधाच्या विषयाची निवड आणि पुढील काळात आपलाच एक विद्यार्थी समजून वेळो वेळी कुशल मार्गदर्शन आणि सहकार्य केल्यामुळे या माझ्या संशोधन कार्यास मी सुरुवात करु शकलो. मी या दोघांचेही आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

ज्यांनी पंढरपूर सारख्या तिर्थक्षेत्रामध्ये आपल्या आयुष्याचा ५० वर्षाचा काळ शिक्षण क्षेत्रात घालवून अनेकांना व अनेक संस्थांना उभे करण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा आहे व ज्यांचा माझ्या जीवनावर अत्यंतीक प्रभाव पडला आहे व मला या शैक्षणिक क्षेत्रात त्या दिपस्थंभ वाटतात त्या माझ्या ति. आत्या श्रीमती कुसुमताई आराध्ये (संचालिका शिशू विहार, पंढरपूर) यांनी माझ्यावर जे संस्कार केले व वेळो वळी मला या क्षेत्रात मार्गदर्शन केले केवळ यामुळेच मी हा प्रबंध लिहू शकलो. त्यांचे आशिर्वाद आणि शुभेच्छा यांच्या बळावर मी हे संशोधन कार्य पूर्ण करु शकलो त्या मुळे त्यांच्या ऋणात राहणे मी अधिक पसंद करेन.

माझ्या जीवनावर प्रभाव टाकणारे व माझ्यावर नितांत प्रेम करणारे माझे मित्र प्रा. राजेंद्रसिंह लोखंडे केवळ यांच्या सहकार्याने व सततच्या आग्रहामुळे मी हा प्रबंध पूर्ण करु शकलो. त्यामुळे एक मित्र म्हणून त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

शिवाजी विद्यापीठ पद्व्यूत्तर शिक्षण केंद्र सोलापूर येथील प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व विभागातील डॉ. रविकिरण जाधव तसेच या विभागाचे प्रमुख डॉ. पाटील यांचे व सर्व स्टाफचे मला या संशोधन कार्यात सतत सहकार्य दिल्या बद्दल मी यांचा ऋणी आहे.

पंढरपूर नगरपालीकेचे मुख्याधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी सर्व कर्मचारी वृंद आणि माझ्यावर सतत प्रेम करणारे माझे सर्व नगरसेवक मित्र आणि लोकमान्य विद्यालयाचे आजी-माजी मुख्याध्यापक व माझे सहकारी शिक्षक या सर्वांचे आर्शिवाद व शुभेच्छा यांच्या बळावरच मी पुर्ण करु शकलो. त्यामुळे यांच्या बद्दल मन:पुर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

माझी पत्नी सौ. अनुराधा व मुलगा चि. अशिष यांनी सबंध संशोधन काळात मला मानसिक आधार दिला आणि मनोमन सहकार्य केले तसेच माझे मनोबल टिकवून ठेवण्यास व हा प्रबंध वेळेत पूर्ण होण्यास मदत केली हे केवळ त्यांच्या सहकार्याशिवाय किंवा मदती शिवाय मी या संशोधन कार्यास जास्तीत जास्त वेळ देवू शकलो. त्यामुळे त्यांच्या ऋणात राहणे मला आवडेल.

माझे सर्व नातेवाईक आणि मित्र मंडळी यांनीपण मला या कार्यात प्रोत्साहन दिले त्यामुळे मी हा प्रबंध पूर्ण करु शकलो त्याबद्दल त्यांचेही मनपुर्वक आभार मानतो.